१० एप्रिल २०२१

मासिकांक २



# “ती” चं पान

## तिच्या कडून सगळ्यांसाठी...

संपादक: सौ. सायली पेशवे देशपांडे

# अनुक्रमणिका


| | शीर्षक | लेखिका | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावना | सौ.सायली देशपांडे | ३ |
| २. | दोन शब्द | अक्षय देशपांडे | ४ |
| ३. | एका रुपयाची एक गोष्ट | निर्मिती देवलसी | ५ |
| ४. | स्विकार | सौ. तृष्णा आंबेकर | ६ |
| ५. | Door Bell | स्वर्णिमा कमलवार | ७ |
| ६. | पळसफुलं, गुलमोहर आणि तू | सौ. अपूर्वा भालेराव | ९ |
| ७. | एक वळण | सौ. मृण्मयी सारंग | ११ |
| ८. | पाऊलखुणा | प्राजक्ता बर्वे | १३ |
| ९. | वारी | भार्गवी बाबरेकर | १४ |
| १०. | सहज सख्या... | सौ. सायली देशपांडे | १६ |
| ११. | समारोप | | १८ |


# लघुकथा विशेषांक

# प्रस्तावना

रसिकहो, "ती" चं पान अर्थात तिच्याकडून सगळ्यांसाठी.. या आमच्या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा हा दुसरा मासिकांक. १० मार्च २०२१ या दिवशी या उपक्रमाचा श्रीगणेशा झाला. पीडिफ स्वरूपात असलेला हा मासिकांक बऱ्याच वाचक रसिकांना आवडला. मागचा अंक हा " महिला दिन विशेषांक" होता. प्रत्येक मासिकांक हा वैशिष्ट्यपूर्ण असायला हवा याच एकमेव उद्देशाने या महिन्याचा अंक हा "लघुकथा विशेषांक" खास तुमच्यासाठी.

या मासिकांकाचं वैशिष्ट्य म्हणजे यात "दोन शब्द" या नावाने असलेलं एक पान हे "त्याचं" असतं. म्हणजे ते लिहिण्यासाठी मी आवर्जून पुरुष व्यक्ती निवडत असते.  "प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते." असं पण नेहमीच ऐकतो. पण कधीतरी त्याचं असणं सुद्धा तिला यशस्वी करतं. या मासिकात लिहिणाऱ्या सगळ्या लेखिका आहेत आणि लिहिलेले विषय हे तिच्या नजरेतले असतात. तिच्या बरोबर त्याला काय वाटतं हे सुद्धा तितकंच महत्वाचं आहे असं मला वाटतं. हेच या मासिकाचं वैशिष्ट्य..!

या सगळ्या उपक्रमात मला ज्याचा नेहमी पाठिंबा असतो असा माझा अत्यन्त जवळचा मित्र म्हणजे माझा नवरा. तसा तो पडद्यामागचा अत्यंत महत्वाचा कलाकार. त्याने या मासिकांकात लिहिलेले "दोन शब्द" माझ्यासाठी अधिकच प्रेरणा देणारे आहेत त्यासाठी त्याचं खूप खूप कौतुक.

लहानपणापासून कथा या शब्दापेक्षा गोष्ट हा शब्द फार जवळचा वाटतो. आपलं सगळं लहानपण हे गोष्टीभवती वसलेलं. मग ती गोष्ट कोणीही सांगो आई आजी आजोबा बाबा किंवा अजून कोणी पण ती ऐकण्याची उत्सुकता कायमच असायची, अगदी आजही असते. फक्त फरक इतकाच साहित्य या विश्वात याच गोष्टीला कथा हे नाव मिळतं आणि तिचे अनेक पैलू आपल्याला कळायला लागतात. प्रत्येकाला आवडणारा कथाप्रकार वेगळा..हाच कथा प्रकार या अंकात आम्ही लिहिण्याचा प्रयत्न केलाय..

प्रत्येकीने वेगवेगळा कथा प्रकार लिहिलाय. मला आशा आहे की या कथेच्या गावात तुम्ही सुद्धा रममाण व्हाल. आणि परत ते लहानपणीचे दिवस आठवतील. या मासिकांकाला सर्वांगसुंदर केलंय ते श्री. अक्षय विष्णू देशपांडे यांनी. त्याच्या नावाप्रमाणेच हा मासिकांक "अक्षय" राहील असा विश्वास आहे...!

तेव्हा ही तिच्या भावनांनी  शब्दबद्ध केलेली एक सुरेख कथायात्रा खास तुमच्यासाठी....!

- सौ. सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द..

वाचकांनो, नमस्कार..! १० मार्च २०२१ ला या मासिकांकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. तो सुद्धा माझ्या डोळ्यासमोर. आकाशवाणीत कार्यरत असलेल्या उद्घोषिकांनी एकत्र येऊन सुरू केलेला हा अनोखा उपक्रम..! मुळात लिखाण हा माझा पिंड नाही पण हे मासिक प्रयत्नशील लेखिकांचे असल्याने मी लिहिण्याचा प्रयत्न नक्कीच करू शकतो.

या सगळ्या **जणींना** भरपूर बोलण्याची, संवाद साधण्याची सवय आहे. अर्थात त्यांच्या बोलण्याला कायम त्यांच्या वाचनाचा आणि आधी त्यांनी केलेल्या लिखाणाचा आधार असतो. वाचन संस्कृती आणि आपलं लिखाण अजून कसं समृद्ध करता येईल या एकमात्र उद्देशाने या मासिकाची निर्मिती करण्यात आली. यात लिहिणाऱ्या सगळ्या लेखिका या नवोदित आणि प्रयत्नशील आहेत हे बघून आनंद वाटतो.

आजच्या काळात सगळ्यांना सगळं on the go लागतं. साधं रोजचं वर्तमानपत्र सुद्धा वाचायला कोणाला वेळ नसतो, मग मासिक किंवा एखादा दिवाळी विशेषांक विकत घेऊन कोण वाचणार आणि चुकून आणलाच तरी एकदा फक्त चाळून झाल्यावर रद्दीच्या गर्दीत हरवून जातो. अर्थात सगळीच कडे अशीच परीस्थिती आहे असं नाही. पण आजच्या ह्या डिजीटल जगात सगळ्यांना (मलासुद्धा) मोबाईल किंवा एखाद्या स्क्रीनवर वाचायला मिळालं तरंच वाचल्या जातं. मग माझ्या सारख्या अनेक डिजीटल वाचकांसाठी असं *e*-मासिक म्हणजे पर्वणीच.

ह्या सगळ्या नवोदित लेखिकेंच्या प्रामाणिक प्रयत्नांना जगापर्यंत पोहचवायला हे मासिक एक प्रभावी माध्यम आहे. ही सगळी **त्यांची पानं** शक्य तितक्या सुंदर पद्धतीने तुमच्या पर्यंत पोहचवणारा मी एक पडद्यामागचा कलाकार. पहिल्यांदाच इथे शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होत तिच्या पानात एक माझं पण पान लिहितोय. तरी चुकभुल द्यावी घ्यावी.

हा **लघुकथा विशेषांक** आपल्याला नक्कीच आवडेल अशी आशा व्यक्त करतो. या मासिकांकाला खूप खूप शुभेच्छा देऊन पुन्हा पडद्यामागे जातो...!

**- अक्षय देशपांडे**

# एका रुपयाची एक गोष्ट......

साधारण उन्हे उतरल्यावर प्रवास करताना मी पश्चिमेच्या बाजूस बसते . मला तसं आपल्या लालपरीतून प्रवास करावयास खूप आवडते आणि मला खिडकी ही हवीच असते . खिडकीजवळ बसायला मी अजूनही धावपळ करते . तशी खिडकी सगळ्यांनाच हवी असते मी मात्र अनेक युक्त्या करून खिडकी मिळवते . एकदा 'मला जरा मळमळतंय ...ओकारी होते , जरा खिडकीत बसू देता का ? ' असे खिडकी जवळ बसलेल्या आणि नुकतीच ओळख झालेल्या शकुंतला काकूंना म्हणाले, माझं बोलणं ऐकताच , त्या क्षणाचाही विचार न करता उठल्या , न जाणे हिला ओकारी झाली तर ..... आपल्याच अंगावर होईल ......... या भीतीने शकुंतला काकूंनी मला खिडकी जवळ ची जागा दिली आणि त्या माझ्या बाजूला बसल्या .

तर अश्या अनेक युक्त्या करून खिडकी पटकावयाची माझी सवय . प्रवास करताना कोणत्या दिशेने जाणार हे पाहावे कारण ऊन लागायला नको . गाडी स्थानकावर लागते तेव्हा ऊन डाव्या बाजूस असते . आपण मग उजव्या बाजूला बसतो . काही जण ऊन नसलेली खिडकीची जागा रिकामी असूनही ऊन असलेल्या खिडकी जवळ बसलेले असतात . आपण म्हणतो काय मूर्ख माणूस आहे . परंतु गाडी जेव्हा मार्गस्थ होऊन मुख्य रस्त्याने, दिशेने जाऊ लागते , तेव्हा ऊन आपल्या बाजूला व सावली तिकडे ! तेव्हा आपल्या बावळटपणाची कल्पना येते. अर्थात अनुभवाने मी कोणत्या बाजूला बसायचे हे लिहूनच ठेवले आहे .

या वेळी मी नागपूरहून पुण्याला जायाला निघाले होते. पश्चिमेच्या मवळतीचे रंग-प्रदर्शन , पळणारी झाडे , घरे , नद्या ह्या गोष्टींचा आनंद घेत मला प्रवास करायला खूप आवडतो . पण यावेळी मात्र माझ्या नशिबात हा आनंद नव्हता .

त्याच असं झालं , की माझ्या शेजारी बसलेल्या शकुंतला काकूंनी तिकीट काढलं , पण त्यांचा एक रुपया कंडक्टर कडे बाकी राहिला . कंडक्टरनेही त्याबाबत कहीही बोलणं केलं नाही .....मागितलं तर बघू अस मनात म्हणून तो कंडक्टर सराईत पुढे निघून गेला . इकडे शकुंतला काकूंनी तिकीट अगदी निरखून - निरखून हिशोब केला . तेव्हा त्यांना खात्री पटली की १रुपया कंडक्टर कडेच बाकी राहिला आहे .

' अगं , माझा १ रुपया राहिला कंडक्टर कडे शकुंतला काकू माझ्या कडे बघत म्हणल्या . 'अहो , देईल तो आणि एवढ्या मोठ्या रकमेतला फक्त १ रुपया राहिलाय ना .... मग देईल तो ते सहसा देत नाहीत . जाऊ द्या .' मी नेहमीच्या अनुभवतातून बोलले .

' कमाल आहे . अगं माझा रुपया राहिला आहे . तुझा राहिला असता तर ? .'

' अहो काकू , माझे २रुपये राहिले आहे , कळलं ? '

तरी तू शांत ? असे सोडायचे नाही . पगार मिळतो ना त्यांना मग प्रवाशांचे पैसे परत नको करायला ?

शकुंतला काकूंनी नेहमीची सराईत वाक्यं मला ऐकवली .

शकुंतला काकू एखाद्या सरकारी खात्यात असतील तर नक्कीच पैसे खात असतील . एवढ्या महागाची साडी , दागिने आणि मुलांसाठी खाऊ घेत असतील आणि इथे मात्र १ रुपया परत मिळाला नाही म्हणून अस्वस्थ झाल्या आहे . रुपया देणारच नाही असं काही कंडक्टर म्हणाला नाही , तरीही काकू तावातावाने त्या बोलतच राहिल्या .

' अहो काकू, तो कंडक्टर रुपया देणारच नाही असं म्हणाला आहे का? मी त्यांना विचारलं ,

नाही , तसं काही नाही म्हणाला .

मग , तुम्ही आधीच कशाला शस्त्र बाहेर काढता . आताच एवढा त्रागा कशाला करता ? मी हे मनात बोलले . पण तरी त्यांचं सुरूच होत त्या जागेवरूनच ओरडल्या .

अहो , कंडक्टरसाहेब , माझा रुपया राहिला बरं का ?

कंडक्टरने क्षणभर शकुंतला काकूंकडे निरखूनच पाहिलं . त्याला अश्या प्रश्नांची सवयच होती.तरीपण त्याच्या चेहऱ्यावरचे बेरकी भाव पाहून त्याने मनात काय म्हटले असेल याची कल्पना मला आली तो शांतपणे म्हणाला,

' देतो .... लक्षात आहे माझ्या '

' नाही, नंतर विसरून जाल म्हणून आठवण केली. '

' तुम्ही ४ रुपये द्या मी ५ चा कलदार देतो? असे कंडक्टरने सुचवले . ' माझ्याकडे सुटे नाहीत तुम्हीच १ रुपया आठवणीने द्या ' शकुंतला काकू म्हणाल्या.

' तुम्ही आत्ता उतरणार आहात का?

'नाही थेट पुणे '

' अहो, मग अजून कितीतरी वेळ आहे . सुट्टे आले की देतो . मी कुठे गाडी सोडून पळून चाललोय .'

' पण द्या बर आठवणीने .'

' तुम्हीही घ्या आठवणीने .'

अशा प्रकारे शकुंतला काकू आणि कंडक्टरमधला वाद तात्पुरता थांबला , वास्तविक शकुंतला काकूंना त्या रुपयाची आठवण पक्की असताना , त्याच कंडक्टरला 'आठवणीनं द्या ' असं पुन्हा पुन्हा सांगत होत्या . तेव्हा मलाच हसू आलं . पाच दहा मिनिटं शांतपणे गेली .

मला खरं तर छान प्रवास अनुभवायचा होता , प्रवासाची एक धुंदी अनुभवण्यात वेगळाच आनंद असतो . त्याच आनंदाचा शोध मी पुन्हा सुरू केला . पण ह्या शकुंतला काकू ......?

त्या म्हणाल्या ' तुला सांगते , अगं असा रुपया घालवून चालत नाही या रुपयांची कोथींबीर ४ दिवस पुरते .' त्या क्षणी मला ईशाच्या त्या वाक्याची आठवण आली . ईशा कोण ,

'अहो ती ईशा , दो रूपये भी बहोत बडी चीज होती है बाबू .' अस म्हणणारी ती तुला पाहते रे मधली . आणि खरच तेव्हा पासूनच या १-१ रुपयांची किंमत मला कळली आणि काकूंमूळे धडाही मिळाला . कारण .......

" एक रुपया भी बोहोत बडी चीज होती है बाबू "

-निर्मिती रा.देवलसी

# स्विकार

शुभ्रा आज रविवार असून देखील सकाळपासून खूप गडबडीत होती, घरचं सगळं आवरून सासुबाईंना सांगून लगेचच निघाली आणि ठरलेल्या ठिकाणी गाडी पार्क करून वाट पाहत मागे पाठ करून मोबाईलमधे काही तरी बघत उभी होती."

(घड्याळात बघत) ही ना कधी सुधारणार नाही"स्वत:च्या मनाशीच बोलत होती; खरंतर किती दिवसांनी भेटतोय आज,वेळेत पोहोचायला नको का हिने, तितक्यात मोठ्यानं "हाऽऽऽय... कशीयेस गं माझी मोटूऽऽ"म्हणत नंदिनी मागून येऊन बिलगली.

"आईऽऽगं पडली असती ना मी आत्ता" शुभ्रा ओरडली ,तू ना कधी सुधारणार नाहीस म्हणत शुभ्राने आपली टेप सुरू केली,.."आता तू आहेस की मग मला सुधारायला"असं म्हणत असतांनाच.. शुभ्राने नंदिनीचे हात बाजूला करत समोरून येऊन तिला कडकडून मिठी मारत म्हटले"खरंच गं नंदिनी मला इतकाऽऽ आनंद झालाय म्हणून सांगू,अगदी नर्सरीत झालेली आपली मैत्री आजही तितकीच घट्ट आहे, आणि आता तर शेवटपर्यंत आपण एकमेकींच्या सोबत राहणार या कल्पनेनेच इतकं भारी वाटतंय ना,"पण खरं सांगू शुभ्रा मला खूऽऽप टेन्शन आलंय गं,"

अगं टेन्शन कसलंय राजला (शुभ्राचा दीर)तर तू आधीपासून ओळखते,तूला तर सगळंच माहितीये नं",राजबद्दल ती नंदिनीला चिडवत होती.

नंदिनी म्हणाली ,नाही गं मला राजचं नाही आपल्या नात्याबद्दल वाटतंय,अगं काहीही विचार करतेस तू, हाच तर प्लस पॉइंट असतो लव्ह मॅरेजचा,आपण सगळ्यांना भेटलो असतो, सगळ्यांचे स्वभाव माहिती असतात त्यामुळे ॲडजस्ट व्हायला फार वेळ लागत नाही गं,शुभ्रा तिला समजावत होती.

"तसं नसतं गं, नातं बदललं ना की सारंच बदलतं "नंदिनी बोलत होती.नणंद-भावजय, जावा,सासू-सून, सासरे-जावई...ही काही नाती अशी असतात की छोट्याशा गोष्टींवरून मतभेद व्हायला वेळ लागत नसतो, गुण-दोषासहित एकमेकांना स्विकारण्याची मानसिकता आजकाल या नात्यांमध्ये पाहायला मिळत नाही गं शुभ्रा..

आता त्यादिवशी श्वेता ताईकडे(शुभ्राची नणंद)तू स्वत:हून रांगोळी काढली का?, नाही ना.., जेव्हा शशांक कडून त्यांना कळलं तेव्हा त्यांनी म्हटल्यावरच तू रांगोळी काढलीस, आणि स्वत:च स्वत:च्या रांगोळीचं प्रत्येकाकडून इतकं कौतुक का करवून घेत होतीस, तुझं असं वागणं सगळ्यांनाच वेगळं वाटत होतं. मला राजनी सगळं सांगितलं त्यादिवशी, हे सगळं आपण का करत असतो माहितीये का शुभ्रा?,

नंदिनी बोलत असताना गाडीवरुन उतरत मधेच शुभ्रा बोलली "नंदिनी माझं ऐकून घे ना,कसंय नं आपण आपल्या कामाचं कौतुक करवून घेतल्याशिवाय लोक करत नाहीत, आपण पुढे मिरवल्याशिवाय आपल्या केल्याची दखल घेतली जात नाही, अगं आताच्या काळात दिखावा करावाच लागतो, मनात एक अन् ओठांवर एक असंच राहावं लागतं, खोटा मुखवटा घालून जगणारे लोकंच 'माणसांची' मनं जिंकतात.

"नाही गं शुभ्रा हे आपल्या मनाचे खेळ आहेत आणि हे का होतं माहितीये, कारण ते नातं आपण स्विकारलंच नसतं, सतत 'मी', 'माझं', ‘मला काय करायचंय’, ‘मी का करू’, या आणि अशा अनेक प्रश्नांनीच गोष्टींची सुरुवात होते आणि मग तिथेच त्या थांबतातही, आपल्यातला **'मी'**पणा हा नात्यातील आपलेपणाच्या आड येतो एकमेकांबद्दल प्रेम, आपुलकी, त्या नात्यातील ओलावा नष्ट होत गेला ना की ते नातं एखाद्या आटलेल्या नदीच्या पात्राप्रमाणे रुक्ष वाटू लागतं. हेच मला आपल्या नात्याबाबतीत घडू द्यायचं नाहीये गं शुभ्रा.. त्यासाठी आपण काय करू शकतो ते तू सांग मी नक्की प्रयत्न करेन "शूभ्रा बोलली ..

त्यावर नंदिनी म्हणली, "अगदी सगळ्यात पहिलं आणि खूप महत्त्वाचं म्हणजे निरपेक्षपणे नातं निभावण्याची भावना आपल्यात असावी, हे एखाद्या नात्यात जेव्हा दोन्ही बाजुंनी घडतं ना तेव्हा आपोआपच ते नातं खुलत जातं, 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हे जरी खरं असलं ना तरी प्रत्येकानेच सामंजस्याने, समोरच्याच्या गुण-दोषांचा स्विकार करत स्वत:च्या सवयींना, विचारांना मुरड घालावी, कुठलीही औपचारिकता न ठेवता नात्यांप्रती कर्तव्यनिष्ठ राहावं.. त्यामुळे नात्यातील प्रेम आणि विश्वासाची वीण घट्ट होऊन ते नातं मनाच्या तळाशी घर करून बसतं; शुभ्रा म्हणाली किती छान समजावतेस गं नंदिनी तू.., पुढे नंदिनी बोलते, कसं असतं , ऋणानुबंधाच्या गाठी स्वर्गात बांधल्या असल्या तरी त्या नात्यांची मुळं खोलवर रूजावी यासाठी आपल्याला प्रेमाचं सिंचन आणि विश्र्वासाचं कुंपण चहूबाजूंनी घालावच लागतं, म्हणजे मग नात्याच्या इवल्याशा रोपट्याचा डेरेदार वृक्ष होतो अन् त्याच्या सावलीत आपण निवांत विसावू शकतो.."

**शेवटी काय तीच तर "मर्मबंधातली ठेव" आहे ना..**

**- सौ. तृष्णा आंबेकर**

# DOOR BELL

संध्याकाळचे पाच साडे पाच वाजले असतील.. बाहेर छान पाऊस पडत होता. रेवा आपल्या बाल्कनीत पुस्तक वाचत बसली होती.

एका हातात चहाचा कप आणि दुसऱ्या हातात तिचं आवडतं पुस्तक..

चहाचा एक एक घोट घेत ती पावसाचा आणि पुस्तकाचा आनंद लुटत होती. तितक्यात तिला door bell चा आवाज आला, तिने दरवाजा उघडला आणि पाहिलं..पण बाहेर कोणीच नव्हतं. ती परत बाल्कनीत जाऊन बसली आणि पुन्हा पुस्तक वाचू लागली. १० मिनिटांनी परत तेच! परत door bell वाजली. खरंतर आत्ता तिला उठायचा कंटाळा आला होता पण दार उघडावं तर लागणारच होतं..म्हणून ती उठली. तिनी दरवाजा उघडला आणि बधितलं..पण परत तेच...बाहेर कोणीच नव्हतं.. ती दार लावणार तितक्यात तिला आतमध्ये काहीतरी फुटल्याचा आवाज  आला. काय फुटलय ते बघायला ती वळली आणि कोणी तरी एकदम दार बंद केल्याचं तिला जाणवलं!

ती घाबरली..इतक्या विचित्र पद्धतीनी कोण आलं असेल असा विचार तिच्या मनात आला. मागे नेमकं आहे तरी कोण हे बघण्यासाठी वळावं की नाही याच संभ्रमात ती हलकिशी वळली. आणि पहाते तर काय...

उंचपूरा, गोरापान असा, निळी ट्रॅक पॅंट आणि पांढरा टी शर्ट घातलेला, काळ्याभोर डोळ्यांच्या रोहन तिच्या समोर उभा होता. ती त्याच्याकडे बघतच राहिली. तो घरी आलाय यावर तिचा विश्वासच बसेना! ती आश्चर्याने त्याच्याकडे बघत असतांनाच तो थोडासा हसला. "तू इथे असा अचानक कसा काय?" हे ती त्याला विचारणार तितक्यात तोच म्हणाला,"मला माहिती आहे रेवा..तुला मला खूप दिवसांपासून भेटायचंय..माझ्याशी बोलायचंय..मला खूप प्रश्न..." प्रश्न असं म्हणत तो जरा थांबला.. "actually प्रश्न नाही..तर जाबच विचारायचा आहे."

रेवा सोबत नेमकं काय होत होतं हे तिचं तिलाच कळत नव्हतं. पण एवढं मात्र कन्फर्म होतं की ती रोहनला तिच्या घरी बघून आधीपेक्षा जरा जास्तच घाबरली होती..

त्याच घाबऱ्या, थरथरत्या आवाजात ती त्याला म्हणाली ,"नाही असं काही नाही..पण...

त्यादिवशी रात्री तू साकेतला का...?" तिचा प्रश्न पूर्ण व्हायच्या आधीच  साकेत हे नाव ऐकताच क्षणी रोहनच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले..त्याच्या डोळ्यातले भाव बदलले.. त्याच्या त्या स्मितहास्यात आत्ता कुठल्यातरी गुढतेची छटा दिसायला लागली होती. खरंतर हे गुढतेचं वलय रोहन रेवाच्या घरी आल्या क्षणापासूनच तयार व्हायला लागलं होतं..आणि ते जाणवायलाही लागलं होतं. तो जसा जसा रेवाच्या दिशेने एक एक पाऊल पुढे टाकत होता तशी तशी रेवा एक एक पाऊल मागे सरकत होती...

तो एकदम तिच्या जवळ आला..तो तिचा हात हातात घेणार तितक्यात...

पावसाच्या तुषारांमुळे ती एकदम खडबडून जागी झाली...पुस्तक वाचता वाचता आपला डोळा लागला होता हे तिला कळलं..आणि जे काही घडलं ते एक वाईट स्वप्न होतं हे तिला जाणवलं.

ती उठली आणि स्वयंपाक घरात पाणी प्यायला गेली....तर तिला dinning table वर ठेवलेला फ्लॉवर पॉट फुटलेला दिसला.

तो फुटलेला फ्लॉवर पॉट ती उचलणार तितक्यात परत एकदा door bell वाजली....

**- स्वर्णिमा**

# पळसफुलं, गुलमोहर आणि तू

आयुष्याच्या रखरखत्या उन्हात तू मला हिरवळीसारखा भेटलास,जसा हवा होतास अगदी तसाच. कदाचित पसाभर अधिकच असेल. तू भेटल्यानंतर एकदा माझ्या लहानपणी आईने भर उन्हात मला दाखविलेला ओसाड माळरानावरला वसंतातला फुललेला केशरी पळस आणि डोक्यावर मावळतीचा सूर्य घेणारा आणि त्या तांबड्याभडक सूर्याच्या रंगात न्हाऊन निघालेला गुलमोहर आठवला. त्यावेळचं ते दृश्य मी नेहमीसाठी डोळ्यात साठवून घेतलं.

भर उन्हात आपलं सौंदर्य टिकवून ठेवणारा पळस आणि गुलमोहर मला अगदी तपस्वी वाटला.त्यावेळच्या माझ्या हर्षाला पारावार उरला नव्हता. त्या रंगात भिजण्याचं आकर्षण आजही आहेच. जीवनाच्या अशा शांत वळणावर काहीतरी फुलणारं,बहरणारं ,मनाला सुखावून सोडणारं दिसल्यानंतर आणि नखशिखांत त्या सौंदर्यात भिजल्यानंतर किती आनंद होतो रे!तोच आनंद तू मला दिलास  पळसफुलं आणि गुलमोहर होऊन...कारण आयुष्याच्या त्या शांत वळणावर ज्यात कोणताही रंग नव्हता; त्यात रंग भरणारा तू मला अगदी तसाच  वाटला. म्हणूनच तू मिळाल्यानंतर ते केशरी किरमिजे रंग माझ्या आयुष्यात खूप खूप सुख घेऊन आले. मला मिळालेला तुझा सहवास मला जगण्याचं नवं बळ देतो.कधी कधी माझ्यात काय पाहिलं म्हणून तू विचारायचास मला..पण खरं सांगू? मी कधीच पाहिलं नाही आणि दिसलंही नाही. पण तुझ्या सहवासात ते मी अनुभवलं. ज्यात नकळत मी फुलत,बहरत गेले. म्हणूनच तुझ्या प्रश्नाचं उत्तर माझ्याजवळ नाही. माझ्याजवळ फक्त पळसफुलं,गुलमोहर आणि तू आहेस.

या निसर्गातील संपूर्ण सौंदर्य आणि तेही भयाण रखरखत्या उन्हातलं..! ईश्वराने किती मोहकपणे सजवलं नाही का रे? आपल्या प्रेमाला अधिक घट्ट करणारे रंग आता सदैव तुझ्या ओंजळीत ठेवावे म्हणजे कोणत्याही क्षणी मन भरून पाहता येईल आणि खरं सांगायचं तर तुझ्या प्रत्येक गोष्टीची माझ्या मनाला भुरळ पडते. तू मनसोक्त दुसऱ्याला देतोस.नखशिखांत भिजवून देतो तुझ्या प्रेमात ते भाग्य मला लाभलं. जगातलं अखिल सौंदर्य ज्यात एकवटलं आहे ते आज माझ्याजवळ आहे यावर विश्वासच बसत नाही.

मी तुझ्या आयुष्यात येण्यानं तू सुद्धा असंच आनंदून गेला की काय? मला माहित नाही. पण तुला हवं असेल ते तुझ्या आशा,अपेक्षा तुझे संकल्प तुझं ध्येय हे सगळं तुला मिळावं म्हणून मीही तुझ्यासोबत आहे. त्या पळसफुलांची आणि गुलमोहराची मधुर कान्ती तुझ्या व्यक्तिमत्वाला लाभावी ही माझीही अपेक्षा आहेच. तुझ्या हातात हात घालून क्षितिजापर्यंत जाण्याची  माझी तयारी आहे.फक्त तुझ्या सुखासाठी,त्यापलीकडे आता माझं जग उरलेलं नाही. एवढ्या अलौकिक गोष्टीची आराधना मी कधीच केलेली नव्हती,पण कुणास ठाऊक नकळत तू मला भेटलास ! माझ्या लौकिक जगात तुला कसं सांभाळावं याचाही विचार मला भांबावून सोडतो.पण नंतर तुझे जगण्याचं बल देणारे शब्द आठवतात. “तुझ्या ओंजळीतच माझं जग आहे! “ मग, तू पुन्हा मला दररोज नवा आणि अलौकिक वाटतो.तुझं वागणं बोलणं सगळं माझ्यासाठीच असावं, असं स्वार्थी विचारही कधी कधी मनात येतो पण मग आठवतात पळसफुलं आणि गुलमोहरही ते नाही का आपल्या रंगाची उधळण निर्व्याजपणे  करतात,तसाच तू ही ! पण एवढं मात्र सांगते,माझ्या अधिकाराचं, हक्काचं निखळ प्रेम मला मिळायलाच  हवं...!

-सौ अपूर्वा भालेराव

# एक वळण..

सौमित्र एक उच्चशिक्षित , देखणा, हुशार आणि श्रीमंत मुलगा. त्याला पाहता क्षणी कोणत्याही तरुणीच्या हृदयाचा ठोका चुकावा असे त्याचे रूप होते. पेशाने इंजिनिअर असणारा तो एका IT कंपनीत उच्च पदावर कार्यरत होता. त्याच्याच रूपाला आणि शिक्षणाला शोभेल अशी त्याची मैत्रीण शाल्मली. दोघही अगदी शाळेपासून एकमेकांच्या सोबत होते. पुढे उच्च शिक्षणासाठी म्हणून शाल्मली परदेशात गेली. त्या दोघांची मैत्री मात्र टिकून राहिली. दोन देशातल्या अंतरामुळे त्यांच्या मैत्रीत मात्र काही अंतर पडलाच नाही. बऱ्याच वर्षानंतर शाल्मली भारतात परतली होती.आणि आज त्या दोघांनी शाल्मलीच्या घराजवळच्या कॅफेत जिथे त्यांची पहिल्यांदा नजरानजर झाली होती तिथे भेटायचे ठरवले. दोघे मुळातच सुंदर होते.आज भेटायचं म्हणून शाल्मलीने हलकासा मेक अप केला होता तर सौमित्र सुद्धा लेदर जॅकेट,डेनिम जीन्स,डोळ्यांवर गॉगल असा पेहराव करून काय बोलायचं याची उजळणी करत होता.

दोघेही आधीपासूनच वेळेचे पक्के असल्यामुळे ठरलेल्या जागी दोघेही अगदी ठरलेल्या वेळेवर भेटले.बरेच वर्षानंतर एकमेकांना बघितल्यावर दोघांचा आनंद गगनात मावत नव्हता. अगदी एकमेकांना किती सांगू आणि किती नाही असं झालं होतं. गप्पांचा अगदी फड रंगला होता.गप्पांमध्ये वेळ कसा निघून गेला हे दोघांनाही कळलंच नाही.बराच उशीर झाला होता,अंधारून आलं होतं,पावसाची भुरभुर सुरू झाली होती त्यामुळे आता दोघांनी घराचा रस्ता पकडायच असे ठरवले. उद्या परत भेटू असं म्हणून दोघेही घराकडे वळले.

सौमित्र हेडफोन लाऊन बाईकवर बसला आणि घराच्या दिशेने निघाला. नेहमीचा रस्ताअसल्याने तो बिनधास्त गाडी पळवत होता. रोमँटिक गाणे आणि इतके वर्षानंतरची शाल्मली सोबत ची पहिली भेट या दोन्हींमध्ये सौमित्र अगदी गुंग होऊन गेला होता. पुढे येणार वळण सुद्धा त्याला नवीन नव्हतं. अचानक त्या वळणावरच त्याला एक वेगळाच आणि आकर्षक निळसर हिरवा असा प्रकाश दिसला आणि गाणी व आठवीत गुंग असलेल्या चत्याचं लक्ष आपसूकच त्या प्रकाश्या कडे खेचल्या गेलं. तो प्रकाश जणू हळूहळू सौमित्र स्वतःकडे खेचतोय असा त्याला भास होत होता. एक वेगळंच आकर्षण, वेगळीच गूढता त्या प्रकाश होती.

त्या रहस्यमयी प्रकाशात तो नकळत गुरफटत जात होता आणि त्याच वेळी समोरून येणारा ट्रक त्याच्या नजरेतून अगदी सहज चुकला आणि गाडीसकट तो लांबवर घासत गेला. क्षणात त्याच्या डोळ्यापुढे अंधारी आली आणि तो कोसळला, गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दगडाला जोरदार आदळून बंद पडली. जरा वेळाने सौमित्र ला थोडी जाग आली. घडलेला प्रसंग अगदी स्पष्टपणे त्याला आठवत होता.

आपल्याला नेमकं कुठे आणि किती लागलं आहे हे बघावं म्हणून त्याने उठायचा प्रयत्न केला तर वेगळाच हलकेपणा त्याला जाणवला. थोडं आश्चर्य आणि थोडी भीती असे मिश्र भाव त्याच्या मनात आले. जसा तो किंचित उठून बसला आणि समोर पाहिले तर त्याच्या डोळ्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. राखडी वर्णाची,अंगभर सुरकुत्या पडलेली,डोळ्यांच्या जागी फक्तच खोबणी असलेली एक म्हातारी तिच्या लांब पोलादासारखी धार असलेल्या नखांनी सौमित्रच्या अचेतन शरीरावर अशी काही तुटून पडली होती जशी ती खूप दिवसांची उपाशी असावी. त्याच्या मासाचा तुकडान तुकडा ती इतक्या चवीने खात होती जणु असे मऊ लुसलुशीत मास तिला पहिल्यांदा मिळालं असावं.

आपण जे काही बघतोय त्यावरून त्याला जे समजायचं ते तर समजलेच पण तो अजूनही त्या आकर्षक निळसर हिरव्या प्रकाशात सामावल्या जात होता. हा सगळ्याच प्रकार बघत असतानाच एक मोठा आवाज झाला आणि सौमित्र भानावर आला. तो आवाज समोरून येणाऱ्या ट्रॅक च्या हॉर्न चा होता. तो ह्या भयाण जगातून परत वास्तविक जगात परतला. त्याने कसेबसे स्वतःला सावरत बाईक उभी केली. त्याचे डोळे त्या म्हातारीला शोधत होते , तो कुठला प्रकाश होता हे जाणून घेण्याचा प्रयत्न करत होते मात्र तिथे तसे काहीच दिसत नाही. तो पूर्वीसारखाच रस्ता व ते पूर्वीचेच वळण त्याला दिसले.

सुदैवाने त्याला फारसे लागले नव्हते आणि गाडी सुद्धा बऱ्यापैकी सुस्थितीत होती. उशिराची वेळ असल्याने रस्त्याने वर्दळ सुद्धा कमीच होती. कसाबसा तो गाडी घेऊन घरी परत आला खरा.. मात्र आपण काय बघितले, शाल्मलीच्या गोड स्वप्नात मग्न असणाऱ्या आपल्याला हे असे विचित्र स्वप्न कसे दिसले?, ते नेमके होते तरी काय?, हे आपल्यालाच का दिसले? ह्या विचारातच त्याची पूर्ण रात्र गेली.  खूप प्रयत्न करूनही तो गूढ प्रकाश, ती म्हातारी आणि ते वळण त्याच्या आठवणीतून जात नव्हते...

**- सौ. मृण्मयी सारंग**

# वारी.....

आमच्या शेजारी सखू आजी राहते. ती विठ्ठलाची निस्सीम भक्त. दर वर्षी न चुकता वारी करणे हा तिने बांधलेला चंगच जणू! आजीची दोन्ही मुलं , म्हणजे मोठी मुलगी ; ती बंगलोर ला असते तर लहान मुलगा बॉस्टन ला मोठा मानसोपचरतज्ज्ञ आहे. सखू आजीचे पती वायू सेनेत असताना  एका लढाईत शहीद झाले . तेव्हा तिची दोन्ही मुलं लहानच होती. आता तिची दोन्ही मुलं उच्च विदयाविभूषित आणि यशस्वी आहेत , आपापल्या संसारात रमली आहेत. थोडक्यात सांगायचं झालं तर सखू आजी एकटीच राहते. दर महिन्यात न चुकता तिची दोन्ही मुलं तिला पुरून उरेल इतके पैसे पाठवतात पण चुकूनही कधी वाट चुकवून आजीच्या भेटीला येत नाहीत !

आजी ची काळजी घ्यायला आजीचा जुना आणि अत्यंत विश्वासू नोकर रामू आणि त्याचा मुलगा नाम्या दोघेही तिच्या सोबत राहतात . नाम्या बाहेरची सगळी कामं करतो तर रामू आजीची काळजी आणि घर नीट सांभाळतो. पण रामू आता थकला असल्याने त्याने आजी आणि घराची सगळी जबाबदारी नाम्यावर टाकली आणि कायमचे गावाला जायचे ठरवले...

नाम्या सुद्धा आजीची तेवढ्याच निष्ठेने सेवा करत होता . आणि आजीचा सुध्दा त्याच्यावर भारी जीव! हे सारं सुरू असताना कोरोनाचं सावट साऱ्या जगावर पसरलं आणि एकाएकी सगळं जग थांबून गेलं..! घरा पासून लांब असलेली माणसं आपली घरं जवळ करू लागली. आजीने नाम्याला त्याच्या गावी , त्याच्या घरी जाण्याचे म्हंटले  पण आजीची जबाबदारी सोडून जाणं त्याला पटत नव्हतं. तरी कसाबसा तो जायला तयार झाला.

नाम्या गावी गेला आणि दुसऱ्याच आठवड्यात आजीला या महामारी ने झपाटले ! आजीचं घर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलं. आम्ही सगळे शेजारी सुद्धा काहीही करू शकत नव्हतो . येण्या जाण्याचे मार्ग बंद असल्यामुळे आजीची दोन्ही मुलंही येऊ शकत नव्हती . तरीही आजी कसंबसं तिच्या पुरतं करत होती .

तिसऱ्या दिवशी बरोबर सकाळी नऊ वाजता आजीच्या  दारावरची बेल वाजली.

" अगं बाई आता या अश्या परिस्थितीत कोण आलं असेल? " असा विचार करतच आजीने दार उघडलं. तो समोर नाम्या दत्त म्हणून उभा होता!

पांढरं शुभ्र धोतर , वर पांढरा सदरा , कपाळावर टिळा गळ्यात तुळशीची माळ आणि तोंडावर मास्क. हसऱ्या चेहऱ्याने तो आजी कडे बघत होता .

" अरे बाबा तू इथे कसा आलास? कोणी तुला अडवले नाही? अरे माझ्या कडे का आलास रे बाबा ? मला कोरोना झाला आहे... डॉक्टर ने कोणाच्याही संपर्कात येऊ नका असे सांगितले आहे! तू जा बघू गावाला परत .."

हे सगळं आजी एका श्वासात बोलून गेली...

" अगं हो हो आजे किती प्रश्न विचारशील! तुझ्या बद्दल समजलं म्हणून धावत इथवर आलो. आणि तू माझी काळजी करू नकोस.  काही होत नाही मला
तुझी काळजी घ्यायलाच आलो आहे मी. आता आत येऊ?"

" बरं बाबा ये आत." आजीने नाम्याला आत घेतले.

" हो... ये गं..." नाम्या मागे वळून पाहत म्हणाला..

तो नाम्याच्या पाठोपाठ हिरवी साडी , हिरवा चुडा,  कपाळावर ठसठशीत कुंकू , गळ्यात मंगळसूत्र आणि तोंडावर मास्क लाऊन एक बाई घरात आली . ते दोघं येताच घर चंदनाच्या सुवासाने दरवळून गेलं.

" नाम्या, ही कोण रे? " आजीने विचारलं.

" ही रखमा, माझी बायको "

रखमा ने आजीला हात जोडून नमस्कार केला..

" मी इकडे तुझ्या कडे यायला निघालो तर माझ्या मागेच लागली...मी पण येते म्हणून! तर घेऊन आलो सोबत . तेवढीच ती तुझी काळजी घेईल.."

"नाम्या. बाळा किती करशील माझ्यासाठी ! माझी स्वतःची मुलं मला भेटायला येऊ शकली नाही आणि तू माझी काळजी घ्यायला तुझ्या बायकोला  घेऊन आलास..!  धन्य आहेस रे बाबा ! " आजी गहीवरलेल्या अवस्थेत म्हणाली.

" आजी मी इतकं काहीच केलं नाहीये. मी आज जो काही आहे ना ते फक्त तुझ्यामुळेच . मी लहान असताना माझ्या शाळेची फी हक्काने तू बाबांकडे द्यायची... दिवाळीला दर वर्षी न चुकता तू आमच्या साठी फराळ आणि नवीन कपडे पाठवायची... त्या सगळ्याची परतफेड तर मी करूच शकत नाही पण तुझ्यासाठी इतकं तर करूच शकतो ना ! " रामू आजीकडे बघत म्हणाला...

"नाम्या. बाळा किती करशील माझ्यासाठी ! माझी स्वतःची मुलं मला भेटायला येऊ शकली नाही आणि तू माझी काळजी घ्यायला तुझ्या बायकोला घेऊन आलास..! धन्य आहेस रे बाबा ! " आजी गहीवरलेल्या अवस्थेत म्हणाली.
" आजी मी इतकं काहीच केलं नाहीये. मी आज जो काही आहे ना ते फक्त तुझ्यामुळेच . मी लहान असताना माझ्या शाळेची फी हक्काने तू बाबांकडे द्यायची... दिवाळीला दर वर्षी न चुकता तू आमच्या साठी फराळ आणि नवीन कपडे पाठवायची... त्या सगळ्याची परतफेड तर मी करूच शकत नाही पण तुझ्यासाठी इतकं तर करूच शकतो ना ! " रामू आजीकडे बघत म्हणाला...
रखमा आजीची आणि घराची काळजी घेऊ लागली आणि बाहेरची सगळी कामं नाम्या करू लागला. हळू हळू आजीची तब्येत चांगली होऊ लागली. तिची टेस्ट करण्यात आली. ती सुद्धा निगेटिव्ह आली. पण आजी उदासच होती . कारण या वर्षीची वारी ती करू शकणार नव्हती . आता वारीला फक्त १० दिवस उरले होते पण आजीला अशक्तपणा जाणवतच होता . ती सारखी विठ्ठलाचा धावा करत होती. "विठ्ठला ... या वर्षी काही मी तुझ्या दर्शनाला येऊ शकत नाही. काही तरी कर पण मला दर्शन दे रे बाबा " असं सारखं म्हणत होती.. आषाढी एकादशीचा दिवस आला. आजीने घरीच विठ्ठलाची पूजा केली , नैवेद्य दाखवला आणि मनोभावे विठ्ठलाला साद घातली. तेवढ्यात फोन वाजला. आजीने फोन घेतला.
" बाईसाहेब नमस्कार मी रामू... आज आषाढी आहे ना! तुमची आठवण झाली म्हणून फोन केला... कशी आहे तुमची तब्येत ? तुमच्या शेजाऱ्यांनी सांगितलं की तुम्हाला कोरोना झाला होता. तुम्हाला खूप फोन केले पण तुमचा फोन बंद लागत होता आज शेवटी लागला..."
" मी बरी आहे रे रामू... यंदा काही वारी नाही म्हणून उगाच मनाला रुखरुख लागली आहे. १५ दिवसांपूर्वीच नाम्या आला रखमा सुद्धा आली त्याच्या सोबत...काय गोड आहे रे पोर! माझी खूप काळजी घेतली या दोघांनी ...."
आजीचं हे बोलणं ऐकून रामू आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला..." हे काय बोलताय तुम्ही बाईसाहेब? नाम्या गावी येता येताच एका अपघातात मारल्या गेला आणि हा धक्का सहन न होऊन त्याच्या बायकोने म्हणजेच रखमानेही प्राण सोडले !"
आजीला हे सगळं ऐकून धक्का बसला. ती त्या दोघांना शोधत शोधत देवघरात आली. समोर बघते तर काय !
साऱ्या देवघरात चंदनाचा सुवास दरवळत होता...आणि त्या सुवासात कंबरेवर दोन्ही हात ठेऊन तेजःपुंज असे विठ्ठल रखुमाई म्हणजेच नाम्या आणि रखमा आजीकडे बघून स्मित करीत होते! आजी निःशब्द होऊन त्या दोघांकडे बघत होती... तिच्या आनंदाश्रुंनी त्यांच्या चरणांवर अभिषेक करत होती!
आजही तो प्रसंग सांगताना आजी सद्गदित होते...तिला स्वतःचे भानच उरत नाही.....!

**- भार्गवी बाबरेकर**

# पाऊलखुणा

त्या दिवशी तुझं आलेलं, ते, "मला भेट, नेहमीच्या ठिकाणी, महत्वाचं बोलायचंय," या आशयाचं पत्र. ते वाचलं आणि माझ्या मनाने आकाशात उंच भरारी घेतली.... इतकी की सहा वाजून पाच मिनिटांनी भेटायला बोलवणाऱ्या तुला, मी तयार होऊन पाच वाजून सहा मिनिटांनेच भेटायला आले... तुझी वाट पाहायला लावणाऱ्या त्या एकेका क्षणाचा मला राग येत होता... शेवटी मी एकटीच वाळूत रेघा ओढंत बसले...

तू आलास आणि काळजाची धडधड वाढायला लागली.

.. इतकी की तुला ऐकू येईल असं वाटलं मला.! कुठेतरी मनात माहित होतं, एवढ्या दिवसांची आपली घट्ट मैत्री... तिनं पुढचा टप्पा गाठला आहे. तुझ्या नावाने चिडवल्यावर आधी आदळ आपट करणारी मी.... आता मात्र कोणी चिडवल्यावर मनापासून खुश व्हायला लागले होते. आता मला ते सगळं सुखद, हवहवसं वाटायला लागलं होतं. हा सगळा विचार करताना, दिल garden garden होत असतांनाच, तू भैया कडून आपली आवडती भेळ घेऊन आलास. मी ती भेळ बकाबका खाल्ली! कारण तुझ्या समोर मी, खरी ... स्वतः सारखी, वागायचे. तू काय विचार करशील ह्याचा विचार मनातसुद्धा येत नव्हता. त्यानंतर आपण नेहमी प्रमाणे निघालो किनाऱ्यावर फिरायला आणि सुरु झाल्या, आपल्या गप्पा....

मला तुझा हात कधी न सोडण्यासाठी धरण्याची घाई झाली होती.... पण तू मात्र विषयंच काढत नव्हतास..... म्हणून मी माझी अधीरता कशीबशी लपवली. चालता चालता थांबून शेवटी तू विषय काढलास... "माझं प्रेम आहे" हे ऐकल्यावर आधी माझ्या काळजाचा ठोका चुकला पण पुढच्याच क्षणी मला उड्या माराव्याश्या वाटल्या. हाच तो क्षण होतं ज्याची मी तू भेटायला बोलावल्या पासुन वाट बघत होते.

माझं मन त्या येणाऱ्या नवीन आयुष्याच्या स्वप्नात फिरत असतांनाच अचानक तुझ्या बोलण्याने भानावर आले कारण..... कारण जिथे मी स्वतःला बघत होते तिथे तुझी मनात माझं नाव नव्हतंच.

दुसऱ्याच क्षणी मनातल्या मनात उड्या मारणारी मी सणसणीत आपटले....

तुझ्या मनातलं सगळं सगळं सांगून, मागे वळूनही न पाहता तू निघूनही गेलास....... तिला विचारायला.. आणि मी तिथेच तुझ्या पाठमोऱ्या आकृतीकडे मनातल्या मनात रडत बघत राहिले.

आज माझी खात्री आहे की तुम्ही नक्कीच बरोबर असाल.... मी मात्र मनाने अजूनही तिथेच आहे... त्याच किनाऱ्यावर.... पण नक्कीच एकटी नाही... माझ्या सोबत आहेत, कायम माझ्या बरोबरीने चालणाऱ्या ....त्या वेड्या आठवणी.. आणि तुझ्या... **"पाऊलखुणा"**...

**- प्राजक्ता बर्वे**

# सहज सख्या..

ग्रीष्मातलं ऊन सकाळची वेळ.. घड्याळाचे काटे आपल्या रोजच्या गतीने सारखे आपल्याच तालात पुढे पुढे सरकत होते. ९ वाजता घड्याळाने ९ ठोके दिले आणि आपल्याच विश्वात रमलेल्या रेवतीला एकदम भान आलं ते त्या आवाजानी.

रेवती... दिसायला सावळी पण सुंदर, रेखीव डोळे, पाठीवर रुळणारी काळ्याभोर केसांची लांबसडक वेणी. या सगळ्या सौंदर्यात भर घालणारं होतं ते तिचं लाघवी हसणं. हसतांना डाव्या गालावर पडणारी खळी म्हणजे आणखी एक सौंदर्यस्थान..वयाच्या २४ व्या वर्षी तिचं पाणिग्रहण केलं ते राजस नी.. राजस हा एका खाजगी कंपनीत मॅनेजर होता. मॅनेजर असल्याने पत मोठी जबाबदारी मोठी आणि कामही जास्त. खाजगी कंपनी असल्याने सुट्यांचा प्रॉब्लेम पण त्यातही रेवती आणि राजस यांचा संसार अगदी आनंदात आणि सुरळित चालला होता. रेवती अगदी अन्नपूर्णा...! तिच्या हातचं सुग्रास जेवण आणि तासनतास चाललेला त्यांच्या गप्पा या दोहोंच्या मिलापात तासभर सहज निघून जायचा. त्यांच्या अनेक सुख दुःखांचा साथीदार होता तो घरचा डायनिंग टेबल. असं सगळं गुण्यागोविंदाने सुरू होतं.

रोज सकाळी रेडीओवरची गाणी ऐकत तिच्या कामांना गती मिळायची. आणि त्याची सकाळ सुद्धा त्या रेडिओच्या आवाजामुळेच व्हायची. काल सुद्धा असंच झालं रेडीओवर लागलेल्या "जागो मोहन प्यारे" या सुरेल गाण्याने त्यांची सकाळ अगदी प्रसन्न झाली. गाणं गुणगुणतच रेवतीने चहाचं आधण गॅसवर उकळायला ठेवलं चहा उकळला तिने तो कपात गाळला दूध घातलं आणि हसतमुखाने राजस ला गुड मॉर्निंग म्हणत चहाचा कप आयता हातात आणून दिला पण रोज तिला प्रतिसाद देणारा आणि रेवतीला मुद्दाम चिडवणारा राजस आज काहीसा हरवल्या सारखा वाटत होता..!

कामाची गडबड टेंशन असेल असं म्हणत रेवतीने त्याचं हे मौन समजून घेतलं. पण आता त्याचा तुटक संवाद तिला अस्वस्थ करायला लागला. न्याहारी झाली की बरं वाटेल त्याला म्हणून तिने छान मेथी पराठ्याचा बेत आखला. त्याचं सगळं आवरून तो न्याहारीला आला पण काहीही उत्तर न देता फक्त तो पराठ्याचे घास पोटात ढकलत होता. निःशब्द आणि शांततापूर्ण वातावरणात त्याने कशीबशी न्याहारी आटोपली. टिफिन घेतला आणि तो ऑफिसला गेला सुद्धा...!

आता घरात उरली ती फक्त एकटी रेवती आणि तिचा रेडिओ. रेडिओ आपल्याच तालासुरात गात होता पण इथे मात्र कितीही विचार केला तरी या दोघांचे ताल सूर कुठेतरी हरवले होते. राजसचं असं वागणं रेवतीला खटकत होतं. लग्न होऊन जेमतेम दोनच महिने झाले होते. आपल्या सुखी संसाराला कोणाची दृष्ट तर लागली नसेल ना? असा स्त्री सुलभ विचार तिच्या मनात येऊन गेला. तिचं मन कशातच रमत नव्हतं. स्वयंपाक झालाच होता जेवायला अवकाश म्हणून तिने पुस्तक वाचायला घेतलं पण मनात राजस त्याचे विचार शेवटी कंटाळून तिने पोटाला आधार म्हणून दोन घास खाल्ले. दुपारी ठरल्याप्रमाणे तिने राजसला फोन केला. फोनवर सुद्धा मोजकीच उत्तरं देऊन त्याने फोन ठेवला.  याला नेमकं झालं तरी काय? हा एकच विचार तिच्या मनात घर करून बसला. ७ वाजता घरी येणारा राजस आज ५:३० ला घरी आला. त्याला लवकर घरी आलेलं बघून रेवतीला जरा हायसं वाटलं.
तिने त्याला आवडते तशी स्ट्रॉंग कॉफी करून आणली आणि त्याच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवित न राहवून त्याला विचारलं," सकाळपासून स्वारी नाराज दिसतेय काय झालंय काय नेमकं? आपण दोघं मिळून त्यावर काही उपाय शोधू" या तिच्या साध्या प्रश्नावर तो अगदीच चिडून बोलला. आज त्याचं ते चिडणं आणि तार सप्तकात लागलेला सूर ऐकून रेवती हबकूनच गेली.  राजसचं बोलणं ऐकून तिला फार वाईट वाटलं. उगीचच आपण त्याला विचारलं असं तिला वाटलं.

संध्याकाळी बगिच्यात फिरून येणारं हे नवदाम्पत्य आज घरीच. एरवी रेडिओवर लागणारं प्रत्येक गाणं गुणगुणणारी रेवती तिचं आवडतं " सहज सख्या एकटाच येई सांजवेळी" हे गाणं सुद्धा गुणगुणत नव्हती. एरवी तिच्या सुरात राजस सुद्धा सूर मिसळून हे गाणं गायचा.अत्यंत आवडतं असं गाणं तिच्यासाठी खूपच रुक्ष झालं होतं.

रात्रीचं जेवण झालं. सगळी आवराआवर झाली. राजस आपलं काम करत हॉलमध्येच बसला. त्याची वाट बघत बघत रेवती बेडरूममध्ये गेली. विचारांची तंद्री लागल्यावर कधी तिचे डोळे लागले ते कळलंच नाही. सकाळी उठल्यावर रेवती आपल्या रोजच्या कामाला लागली. घराच्या बगिच्यात जाऊन देवपूजेसाठी फुलं तोडून आणली. ग्रीष्म आणि मोगरा हे निसर्गाचं समीकरण काही त्यांच्या बगिच्यात अपवाद नव्हतं मनसोक्त मोगऱ्याची टपोरी फुलं तिने तोडून आणली आणि डायनिंग टेबल वर फुलांची टोपली ठेवली. मोगरा हा त्या दोघांचा विक पॉईंट..!पण आज दोघांमध्ये विशेष संवाद नव्हता रोजचं हसतंखेळतं घर आज खूप शांत होतं.

राजस तयार होऊन डायनिंग टेबल वर न्याहारीची वाट बघत बसला.लक्ष गेलं ते त्या टपोऱ्या मोगऱ्याच्या फुलांकडे. त्याची कळी कालपासून शांत होती तिला बोलतं करायला फुलांचा गजरा करणं क्रमप्राप्त होतं आणि सॉरीच्या सोबतीला मोगरा होताच..! त्याला लहानपणी आईने गाठीचा गजरा गुंफायला शिकवलं होतं ते एकदम त्याला आठवलं आणि काही वेळात गजरा तयार. रेवतीने गरमागरम पोहे केले आणि प्लेट राजस ला दिली. त्याचा टिफिन भरायला ती वळली तेवढ्यात राजसनी तिचा हात धरला. त्याच्या स्पर्शाने तिच्या डोळ्यांत पाणी आलं. तिला त्याने खुर्चीवर बसवलं आणि तिला आवडतो तसा त्याने गुंफलेला गजरा तिच्या काळ्याभोर केसात माळला..

पोह्याचा एक घास तिला भरवला आणि त्याच्या असं विचित्र वागण्याचं कारण तिला सांगितलं. ऑफिसमध्ये असलेलं कामाचं लोड त्यानी तिला सांगितलं आणि सगळं घडाघडा बोलून तो मोकळा झाला.तिची माफी मागितली. त्यांच्यातली शांतता हळूहळू निवळली पण ती कुठेतरी दुखावली गेली होती. पण आनंद हा होता की त्यांच्यातलं वादळ पेल्यातच शमलं.

आपलं सुद्धा असंच होतं आपल्यात सुद्धा कुठेतरी राजस रेवती असतात राजस जर बोलला नाही तर आपल्यातली रेवती कुठेतरी दुखावते. संसारात एकमेकांना समजून घेणं,साथ देणं हीच खरी गंमत असते. होणारे वाद आणि वैचारिक वाद हे पेल्यातच शमले पाहिजे.आता काय दोघांना स्वर्ग अगदी दोनच बोटं उरला होता. त्यांच्यातला संवाद सुरू झाला होता. आणि या सुखाच्या सोबतीला साथ होती ती त्यांच्या आवडत्या गाण्याच्या ओळींची.. रेडिओ वर लागलं परत तेच गाणं...

"सहज सख्या एकटाच येई सांजवेळी वाट।
वाट तुझी पाहीन त्या आम्रतरुखाली॥
अधरी जे अडत असे सांगीन तुज गुज असे।
प्रीत ही प्रीतिविण अजूनही अबोली...."

**- सौ सायली अक्षय देशपांडे**

# समारोप

वाचकांनो, म्हणता म्हणता ती चं पान दोन महिन्याचं झालं. या एका उपक्रमाने आम्हाला खूप काही दिलं. प्रत्येकीचं साहित्याप्रति असलेलं प्रेम अधिक दृढ केलं. तिच्यातली ती हळूहळू तिला उमगायला लागलीये. तिच्या विचारांना भावनांना इथे हक्काचं स्थान मिळतय याचा आनंद वर्णनातीत आहे. मागचा अंक महिला दिन विशेष हा अंक लघुकथा लेखन विशेष...! माझ्या या प्रामाणिक प्रयत्नांना माझ्या या सख्यांनी होकार दिला. त्यांच्या उत्तम प्रतिसादामुळेच हे शक्य होतंय. तेव्हा तुम्ही पण या कथांचा आस्वाद घ्या...!

आपण हा आमचा छोटासा प्रयत्न गोड मानून घ्याल अशी आशा व्यक्त करते आणि आपला निरोप घेते ...!

